करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०



Shweta Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी थार(जीप) 4 X 4 येथे उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )



रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२४ | पाने-१२ | दि.४/०४/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.



॥ श्री ज्योतिबा प्रसन्न ॥
फ्रेंड्स मोबाईल शॉपी & इलेक्ट्रॉनिक्स
आमच्याकडे सर्व नामांकित कंपन्यांचे नवीन **मोबाईल** व **स्मार्ट एलईडी टिव्ही** होलसेल दरात मिळतील.
मोबाईल खरेदीवर हमखास भेटवस्तू
सर्व प्रकारचे फायनान्स उपलब्ध
डाऊन पेमेंटवर मोबाईल मिळेल.
एक्सचेंज : जुना द्या, नवीन घ्या..!
प्रोप्रा : प्रफुल प्रदीप शिंदे
पत्ता : किल्लावेस, करमाळा.(9823162510, 9326969696)

फ्रेंड्स डान्स क्लासेस
लहान मुले, मुली व महिलांसाठी
• झुम्बा • बॉलीवुड • लावणी
• क्लासिकल इ. नृत्य प्रकार शिकवले जातील.
प्रोप्रा : मनिषा प्रफुल शिंदे (मॅडम)
पुष्पादीप निवास, किल्ला विभाग, करमाळा(9823162510)


# अखेर आदिनाथची निवडणूक होणार - शेवटच्या दिवशी ६२ जणांचे अर्ज मागे

## तिरंगी लढत अटळ



करमाळा : अनंत अडचणीत असलेल्या आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ही बिनविरोध व्हावी; अशी सर्वसामान्य सभासदांची अपेक्षा असताना उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ६२ जणांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. उमेदवारी राहिलेल्या मध्ये विद्यमान आमदार नारायण आबा पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे तसेच प्रा.रामदास झोळ यांच्या गटाचे उमेदवार निवडणुक रिंगणात राहिले आहेत. यानुसार गटनिहाय उमेदवारांचे अर्ज पुढीलप्रमाणे...

**आमदार नारायण पाटील गट (महाविकास आघाडी)**

**जेऊर गट** - श्रीमंत त्रिंबक चौधरी, महादेव श्रीपती पोरे, दत्तात्रय रामचंद्र गव्हाणे. **सालसे गट** - रविकिरण पोपट फुके, दशरथ येदू हजारे, आबासाहेब उर्फ वसंत शंकर अंबारे. **पोमलवाडी गट** - किरण जगन्नाथ कवडे, नवनाथ मधुकर झोळ, संतोष खाटमोडे-पाटील **केम गट** - दत्तात्रय हरिश्चंद्र देशमुख, विजयसिंह जिजाबा नवले, महेंद्र दिनकर पाटील. **रावगाव गट** - देवानंद गोपाळ बागल, ॲड.राहुल सावंत, डॉ.अमोल घाडगे. **सोसायटी गट** - डॉ.हरिदास केवारे. **अनु.जाती जमाती प्रवर्ग** - राजाभाऊ कदम **महिला राखीव** - राधिका भि. तळेकर, उर्मिला ह. सरडे **इतर मागासवर्ग** - दादासाहेब नामदेव पाटील **एन.टी. प्रवर्ग** - आमदार नारायण पाटील.

**माजी आमदार संजयमामा शिंदे गट (आदिनाथ बचाव पॅनल)**

**जेऊर गट** - चंद्रकांत सरडे, प्रशांत पाटील, प्रमोद बदे **सालसे गट** - विलास जगदाळे, नागनाथ चिवटे, नवनाथ जगदाळे **पोमलवाडी गट** - दशरथ पाटील, नितीन राजेभोसले, बबन नि. जाधव **केम गट** - मा.आ.संजयमामा शिंदे, सोमनाथ देशमुख, सोमनाथ रोकडे **रावगाव गट** - अभिजीत जाधव-पाटील, आशिष गायकवाड, विनय ननवरे **सोसायटी गट** - सुजित बागल **अनु.जाती जमाती प्रवर्ग गट** - बाळकृष्ण सोनवणे **महिला राखीव गट** - मंदा तात्यासाो सरडे, शालन मोहन गुंडगिरे **इतर मागासवर्ग प्रतिनधी** - रोहिदास माळी **भटक्या विमुक्त जाती प्रवर्ग** - अनिल शहाजी केकान

**प्रा.रामदास झोळ गट (श्री आदिनाथ शेतकरी विकास पॅनल)**

**जेऊर गट** - रविंद्र सदाशिव गोडगे, शांतीलाल यशवंत जाधव, दत्तात्रय बलभिम कामटे **सालसे गट** - आण्णासाहेब भागवत देवकर, दत्तात्रय श्रीरंग जगदाळे, भरत गुलाबराव सरडे **केम गट** - सुधीर हरीदास साळुंके, बापुराव ज्ञानदेव तळेकर **रावगाव गट** - कल्याण सि. पाटील (पान ३ वर)


यशोदीप प्रा.लि;
आपल्या सेवेत घेऊन आलो आहोत..
"सर्वसोयीनेयुक्त"
यशोदीप मंगल कार्यालय
पत्ता : यशोदीप नगर, निलज रोड, करमाळा.

दैवत.. आई-वडिलांचा शुभ-आशिर्वाद




बुकींग सुरू

वैशिष्ट्ये
• शहरापासून ५ मिनीटाच्या अंतरावर
• शांत व निसर्गरम्य वातावरण
• प्रशस्त डायनिंग हॉल
• सुसज्ज बैठक व्यवस्था
• सुसज्ज ४ एकर पार्किंग व्यवस्था
• सुसज्ज सहा रुम

एकदा येवून तर पहा.. आपण सुध्दा म्हणताल..
मंगल कार्यालय म्हणजे... आपलं.. यशोदीपचं !
आपलं लाडक्यांसाठी.. आपलं हक्काचं..
आपलं 'यशोदीप मंगल कार्यालय' !

सर्व प्रकारच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
• लग्न • वाढदिवस • नामकरण • साखरपुडा • स्वागत समारंभ
• रिसेप्शन • गेट टुगेदर • डोहाळे जेवण • बैठक, मिटींग

संपर्क : यशोदीप ज्वेलर्स, दत्तपेठ, करमाळा. (9405713769, 9423069349)

समाजात काही बनण्यासाठी समाजसेवा म्हणजे गरजवंताला मदत करण्याची गरज असते...

## संपादकीय..........................................!

# आदिनाथ मागील निवडणुका..!

आदिनाथच्या निवडणूक निमित्ताने सन २०१२ च्या निवडणुकीत दुरंगी लढत झाली होती तर सन २०१७ च्या निवडणुकीत चारही गट आमने-सामने ठाकले होते. प्रचारामध्ये प्रत्येकजण आदिनाथ लवकरच शक्तीनिशी उभा करू तसेच आदिनाथच्या पुर्व वैभवाबाबत चर्चा करत होते. निकालानंतर पुढे काय झाले हे सर्वांनाच माहित आहे.

खरंतर आदिनाथचा भूतकाळ आठवला तर आदिनाथचा आलेख सतत वर-खाली झालेला दिसतो. अगदी आदिनाथ उभारणीच्या अगोदर जोरदार राजकारण घडत होते. कारखाना कागदावर असताना सुध्दा दोन वेळा निवडणूका झाल्या होत्या. १९७१ ची स्थापना असलेला आदिनाथ कारखाना तब्बल २२ वर्षानंतर सुरू झाला. सन १९९३ ला गळीत चाचणी हंगाम झाला. त्यानंतर कारखाना गतीमान झाला. त्यानंतर सन १९९८ -९९ च्या कालावधीत कारखाना कर्जमुक्त झाला. त्यानंतर आदिनाथला चांगले दिवस येणार म्हणताना पुन्हा सहवीज निर्मितीचे मोठे युनिट उभे करण्याच्या नादात व टर्बाइन बदलाच्या गडबडीत कारखाना पुन्हा कर्जात अडकला. त्या कर्जातून कारखान्याला बाहेर पडण्यासाठी तब्बल चार-पाच हंगाम वाया गेले. पुन्हा चांगले दिवस आले असे वाटताना आणि कारखान्याचा जमा-खर्च बरोबरीत आहे असे वाटत असताना, पुन्हा कारखाना डबघाईला आला. कारखान्याच्या कामगारांना ले ऑफ देण्याची वेळ आली. सभासदांचे पैसे देण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागले, पुरेसे गाळप करता आले नाही. खर्च वाढत गेला. या कठीण स्थितीत मार्ग काढण्याची वेळ असताना निवडणूक लागली. खरं तर या स्थितीत सत्ताधारी व विरोधकांनी एकत्र बसून आजारी कारखान्याची परिस्थिती बदलण्यासाठी बिनविरोध निवडणूकीचा मार्ग स्विकारणे आवश्यक होते पण तसे त्यावेळीही झाले नाही व यावेळीही झाले नाही.

कोणताही साखर कारखाना चालवताना दोन गोष्टी महत्वाच्या असतात, त्यामध्ये नैसर्गिक स्थिती व दुसरी बाब प्रशासन. आदिनाथची नैसर्गिक स्थिती तशी खुपच चांगली आहे. उजनीचे पाणी जवळच असल्याने कारखाना टप्प्यात ऊस आहे. विशेष म्हणजे बैलगाडीने वाहून आणणारा ऊस आदिनाथला मिळतो. ताज्या उसाला रिकव्हरी चांगली मिळते. खरंतर कारखान्याला चांगल्या ऊसाची अडचण नाही व नव्हती, अडचण एकच होती की ऊस असूनही अनेक सभासद राजकीय सोय पाहून आपला ऊस बाहेरच्या कारखान्याला देत होते व देत आहेत. त्यामुळेही काही अंशी कारखान्याला फटका बसला आहे. याबरोबरच दुसऱ्या बाजुला प्रशासनाच्या चुकामुळे एक हंगाम वाया गेला. सन २०१५ च्या हंगामात ऊस असूनही शेतकी अधिकाऱ्याच्या मुर्खपणामुळे ऊसतोड टोळ्या व वाहने उपलब्ध झाली नाही. एवढेच नव्हेतर संबधित अधिकाऱ्याने ७० लाख रूपये गायब केले. अखेर त्या अधिकाऱ्यावर पोलीस केस करावी लागली. एक हंगाम बिघडला की कारखाना नॉर्मल होण्यासाठी दोन हंगाम मेहनत घ्यावी लागते. दुर्दैवाने पुढचा हंगाम सुरू झालाच नाही. त्यामुळे आणखी स्थिती बिघडत गेली.

निवडणुकीत सर्वच गटांच्या प्रतिनिधींना यश अपेक्षीत असते, असे असलेतरी मतदारांच्या मनात नेमके काय आहे, त्यावर यश अवलंबून असते. कारण २००१ पुर्वी आदिनाथची सत्ता बागल गटाकडे होती, ती सन २००१ च्या निवडणूकीत जगताप गटाकडे गेली. पुढे सन २००६ निवडणुकीत जगताप गटाची सत्ता बागल गटाकडे गेली. या तालुक्यात सत्ता बदलाची प्रक्रिया सतत सुरू असते. जेंव्हा नेते हुशारी करतात तेंव्हा मतदार कमी पडतात. म्हणजे जेंव्हा दोन गटाची युती होते तेंव्हा मतदाराला स्वत्व दाखवता येत नाही. त्यावेळी १३ फेब्रुवारी २०१२ रोजी झालेल्या दुरंगी निवडणूकीत बागल-पाटील गटाची सरशी झाली होती. त्यावेळी बागल व पाटील गट यांची युती माजी आमदार संजयमामा शिंदे यांनीच करून दिली होती. त्यांच्या विरूध्द जगताप गट (त्यात मोहिते-पाटील समर्थक) अशी लढत झाली होती. त्यावेळी २७ हजार २०० मतदान होते, त्यापैकी ८२ टक्के मतदान झाले. निकालामध्ये जवळपास चार ते साडेचार हजार मताचा फरक होता. जेऊर गटामध्ये धुळाभाऊ कोकरे-१२७८०, केरू गव्हाण-१२२५७ व धनंजय डोंगरे -१२५७३ (सर्व विजयी बागल-पाटील गट) गणेश चौधरी -८०३५,गोरख लबडे-८६१२ व सतिश निंबाळकर-८३४२ (सर्व पराभूत जगताप गट). सालसे गटामध्ये कन्हैय्यालाल देवी-१२७५३,शिवाजी ढवळे-१२६७४ व बाबासाहेब पाटील -१२६३४ (सर्व विजयी बागल-पाटील गट) दत्तात्रय जगदाळे -८५२२,दादासाहेब सरडे-८४७५ व ज्ञानदेव हांडे-८०२७ (सर्व पराभूत जगताप गट). पोमलवाडी गटामध्ये तानाजी झोळ-१२७८०, नवनाथ झोळ-१२७३८ व शिवाजी पांढरे -१२५२४ (सर्व विजयी बागल-पाटील गट), नवनाथ दुरंदे-८५६४,संतोष पाटील-८७१० व गणपत मगर-८१२५ (सर्व पराभूत जगताप गट). केम गटामध्ये निळंकंठ देशमुख-१२७४२, भागवत पाटील-१२४९१ व भारत साळंके -१२१६८ (सर्व विजयी बागल-पाटील गट)बापूराव देशमुख-८४५४,युवराज रोकडे-८२४२ व नवनाथ शिंदे-८००७ (सर्व पराभूत जगताप गट)रावगाव गटामध्ये डॉ. प्रदीप पाटील-१२९०६,दिनेश भांडवलकर-१३०२२ व शामलताई बागल -१३०२२ (सर्व विजयी बागल-पाटील गट)जयवंतराव जगताप -८८२०, शांतीलाल झिंजाडे-८२२४ व सुभाष सावंत-८२७८(सर्व पराभूत जगताप गट) दुर्बल घटक : राजेंद्र धांडे १२९१०(विजयी,बागल गट )सतिष चोपडे-८६१४ (पराभूत जगताप गट). महिला राखीव गटामध्ये सुवर्णा राऊत -१२५७५,शोभा लोकरे -१२२५३ (सर्व विजयी बागल-पाटील गट)अंजना ढवळे-८२२७,शांताबाई रोकडे-७९५८ ( पराभूत जगताप गट)

त्यानंतर १८ मे २०१७ रोजी मतदान झाले. त्यावेळी बागल, पाटील, जगताप व शिंदे गट अशी चौरंगी लढत झाली. त्यावेळी २० मे २०१७ ला मतमोजणी झाली. त्यात मिळालेली मते पुढीलप्रमाणे...सहकारी संस्था मतदार संघात ४३६ मतदान होते. त्यापैकी ४२२ मतदान झाले. ६ मते बाद झाली. बागल गटाचे उमेदवार डॉ.हरिदास केवारे (२३२ विजयी), शिंदे गटाचे सुर्यकांत पाटील (१२२), पाटील गटाचे विजय पवार (६२). जगताप गटाचा उमेदवार नव्हता. गासवर्गीय मतदार संघ - बागल गटाचे रमेश कांबळे (६७५३ विजयी), पाटील गटाचे राजेंद्र कदम (५४०५), शिंदे गटाचे बाळकृष्ण सोनवणे (४७६२). जगताप गट औदुंबर मोरे (३३०१)इतर मागासवर्गीय मतदार संघ - बागल गटाचे प्रकाश झिंजाडे (६८०७ विजयी), पाटील गट महेश चिवटे (५४३५), जगताप गट श्रीराम जाधव (३३९९), शिंदे गट मधुकर कुर्डे (४७५३).भटक्या विमुक्त जाती जमाती मतदार संघ - बागल गटाचे नामदेव भोगे (६८१२ विजयी), पाटील गट प्रमोद ढेरे (५३०७), शिंदे गट राजेंद्रसिंह पाटील (४७७८), जगताप गट रायचंद खाडे (३३४३) महिला मतदार संघ - बागल गटाच्या भामाबाई केकान (६५८८ विजयी), मंदा गोडगे (६२४१ विजयी)., पाटील गट शारदा मंगवडे (५३२९), उमा सरडे (४८७०)., शिंदे गट मनिषा ढेरे (४४५१), सुवर्णा राऊत (४१४२)., जगताप गट नंदा खाटमोडे (३३८६), अनिता ढवळे (३२७९) ऊस उत्पादक जेऊर गट - बागल गटाचे धनंजय डोंगरे (६५८५ विजयी), चंद्रहास निमगिरे (६६५१ विजयी), रामचंद्र पवार (६४४९ विजयी)., पाटील गट धुळाभाऊ कोकरे (५५१८), दत्तात्रय गव्हाणे (५३७४), श्रीमान चौधरी (५०६५)., शिंदे गट रविंद्र गोडगे (४४७८), संदिपान पोळ (४३९०), वामनराव बदे (४४७८)., जगताप गट महादेव कामटे (३५२२), गोरख लबडे (३४३२). ऊस उत्पादक सालसे गट : बागल गट स्मिता पवार (६५३० विजयी), अविनाश वळेकर (६२८३ विजयी), पोपट सरडे (६०४० विजयी)., पाटील गट सुधाकर लावंड (५३०३), दिपक वाळुंजकर (५०६६), पंडित वळेकर (५०७६)., शिंदे गट तात्यासाहेब मस्कर (४५५९), शहाजी राजेभोसले (४५९६), कन्हैय्यालाल देवी (४७७८)., जगताप गट भारत काकडे (३३१०), तात्यासाो शिंदे (३१९५), दादासाो सरडे (३२३७). ऊस उत्पादक पोमलवाडी गट : बागल गट किरण कवडे (६५०१ विजयी), नितीन जगदाळे (६३८० विजयी), शिवाजी पांढरे (६३११ विजयी)., पाटील गट नवनाथ झोळ (५३६८), उदयसिंह पाटील (५१८२), संतोष पाटील (५२३९)., शिंदे गट सुहास गलांडे (४४७०), तानाजी झोळ (४५२५), सुर्यकांत पाटील (४४६०), जगताप गट दादासाहेब कोकरे (३३६९), नवनाथ दुरंदे (३१९८), नागनाथ लकडे (३१५०). ऊस उत्पादक केम गट : बागल गट पांडुरंग जगताप (६६१० विजयी), बापूराव देशमुख (६६९७ विजयी), नानासाहेब लोकरे (६४५३ विजयी)., पाटील गट महेंद्र पाटील (५४७९), नवनाथ शिंदे (५१३५), पोपट सातव (४८६२)., शिंदे गट सतीश देशमुख (४३८८), जालिंदर बसळे (४२४८), नवनाथ भांगे (४४५२)., जगताप गट शहाजी देशमुख (३५५१), रोहिदास माळी (३१६५), सुहास रोकडे (३२४४). ऊस उत्पादक रावगाव गट : बागल गट कल्याण गायकवाड (६३५३ विजयी), संतोष पाटील (६५०३ विजयी), रश्मी बागल (६९२३ विजयी)., पाटील गट गोवर्धन करगळ (५१०६), नानासाहेब घाडगे (५०९०), देवानंद बागल (५१८७)., शिंदे गट सचिन काळे (४३६९), सुजित बागल (४६१९), सुभाष शिंदे (३९७४)., जगताप गट विलास घाडगे (३१३८), जयवंतराव जगताप (३८७९), सदाशिव भालेराव (२९५१).

आत्ताचे मतदान १७ एप्रिलला होत आहे. मतदारांची फार मोठी जबाबदारी आहे. कारण आदिनाथ वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. आदिनाथ हे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे बलस्थान आहे. अनेकांचे त्यावर संसार अवलंबून आहेत. त्यामध्ये केवळ कामगारच नाहीतर सभासद, ऊस तोड कर्मचारी, वाहतुक ठेकेदार, व्यापारी, छोटे छोटे व्यवसायीक अशा एक ना अनेकांना अशा संस्थेचा आधार असतो. त्यामुळे ही संस्था वाचवण्यासाठी आता पार्टी प्रेम, श्रध्दा, भक्ती यापेक्षा संस्था वाचवणारे कोण आहेत व संस्था बुडवणारे कोण आहेत; याचा विचार करून चाणाक्षपणे मतदान झाले पाहिजे. जर यावेळी चुक झाली तर पुन्हा कारखाना वाचवण्याची भाषा करायलाही शिल्लक राहिल की नाही हे सांगता येणार नाही. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. अभी नही तो कभी नही.., यानुसार प्रत्येक मतदारांने विचारपुर्वक मतदान केले पाहिजे. गटापेक्षा व्यक्ती व त्याचे कार्य पाहून मतदान झाले तर बरेच प्रश्न सुटतील.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे...

## अखेर आदिनाथची निवडणूक होणार - तिरंगी लढत अढळ

सुभाष बापुराव शिंदे, हरीभाऊ झिंजाडे. **पोमलवाडी गट** – रामदास झोळ, भरत विठ्ठल जगताप, प्रकाश सर्जेराव गिरंजे **भटक्या जाती जमाती प्रवर्ग** – रायचंद कृष्णा खाडे **अनु.जाती जमाती प्रवर्ग** –दशरथ भिमराव कांबळे **इतर मागास प्रवर्ग** – रविंद्र सदाशिव गोडगे **महिला राखीव गट** – इंदुबाई आजिनाथ नाईकनवरे, रत्नमाला ज्ञानदेव मंगवडे **सोसायटी गट** – दशरथ भिमराव कांबळे. आदिनाथच्या निवडणुकीसाठी १७ एप्रिलला मतदान होणार असून १९ एप्रिलला मतमोजणी होणार आहे

## आंबेडकर जयंतीनिमित्त केम येथे विविध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन



करमाळा(सं.प्र.) : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ११ ते २० एप्रिल या कालावधीत केम येथे विविध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शालेय उपक्रम व सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी ११ एप्रिल चित्रकला स्पर्धा, १२ एप्रिलला निबंध स्पर्धा, १३ एप्रिलला रात्री ८ ते १२ पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महामानवंदना (भीमगीते),१४ एप्रिलला सकाळी १० वाजता धम्मवंदना (मेनचौक) व सायंकाळी ७ वाजता भिमजन्मोत्सव सोहळा होणार आहे. १५ एप्रिलला मुलींसाठी रांगोळी स्पर्धा, १६ एप्रिलला खेळ पैठणीचा कार्यक्रम होणार आहे. १७ एप्रिलला सायंकाळी सात वाजता वक्तृत्व स्पर्धा, १८ एप्रिल ला सायंकाळी ७ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम, १९ एप्रिलला सायंकाळी ६ वाजता बक्षीस वितरण होणार आहे. २० एप्रिलला सायंकाळी पाच वाजता पारंपारिक पध्दतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. हा उत्सव यशस्वीरित्या साजरा करण्यासाठी अध्यक्ष समाधान गाडे, उपाध्यक्ष नागनाथ कांबळे, सचिन रणशृंगारे, ग्रा.पं.सदस्य विजयसिंह ओहोळ, योगेश ओहोळ, दिपक पोळके, सचिव प्रणय देडगे, वसंत वजाळे, लोकेश बनसोडे, किशोर पोळके, मधुकर गाडे, महेश कांबळे, सुधीर गाडे आदी समाज बांधव व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.


आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



**जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स** पोंधवडी, ता.करमाळा.

**• गुजरात दर्शन** कालावधी : दि.५/५/२०२५ ते १४/५/२०२५
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ पोरबंदर, द्वारका, गिर अभयारण्य
सहल खर्च : रू.११,०००

**• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.१५/५/२०२५ ते २७/५/२०२५
सहल खर्च रू.३०,५०० (रेल्वे प्रवास ३ एसी)

**• कन्याकुमारी दर्शन** कालावधी : दि.२/६/२०२५ ते १०/६/२०२५
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
सहल खर्च : रू.१३,८००

**• चारधाम दर्शन** कालावधी : दि.१३/६/२०२५ ते २८/६/२०२५
सहल खर्च : रू.३५,०००

**• त्रिस्थळी दर्शन यात्रा** सहल खर्च : रू.१४,८००
श्री काशी विश्वनाथ गया, अयोध्या, प्रयाग
कालावधी : दि.२७/६/२०२५ ते २/८/२०२५

• रेल्वे प्रवास • बस प्रवास • भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



बुकींग सुरू

संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८



**विघ्नहर्ता इंटिरीयर**
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
**देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर**

• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका



प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर


## कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामासाठी ७३ हजार २२७ रू. ची देणगी



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामासाठी गुढीपाडव्यानिमित्त ७३ हजार २२७ रुपयाची देणगी मंदिर समितीकडे प्राप्त झाली आहे. कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामासाठी मंदिर समितीकडून केलेल्या आवाहनानुसार करमाळा येथील भाविक सचिन माहुले यांचेकडून ५ हजार रूपये, संजय राधाकिसन चौधरी यांचेकडून ११ हजार १११ रूपये, भालचंद्र रामचंद्र धोकटे यांचेकडून १६ हजार ११६ रूपये तर दत्तात्रय बाळनाथ जगताप, राजेंद्र जगताप व जगताप परिवार यांचेकडून ४१ हजार रूपये अशी एकूण ७३ हजार २२७ रूपयाची देणगी प्राप्त झाली आहे. या सर्वांचे सत्कार श्री जगदंबा कमलादेवी मंदिर समिती तर्फे करण्यात आले. यावेळी विश्वस्त, पुजारी, सेवेकरी, मानकरी उपस्थित होते. भाविकांनी सढळ हाताने देणगी देऊन सदरच्या कामास सहकार्य करावे; असे आवाहन श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे. ऑनलाईन देणगीची सुविधा उपलब्ध असून यासाठी अशोक गाठे (व्यवस्थापक) मो.९४०४७०८९२४ येथे संपर्क साधावा.


**कै.डॉ.प्रदीपकुमार (आबा) जाधव-पाटील यांच्या**
**शुक्रवार दि.१८ एप्रिल २०२५ रोजी असणाऱ्या जयंती निमित्त**
आई कमला भयानी सामा.बहु.संस्था करमाळा,माईर्स विश्वराज हॉस्पिटल-पुणे,रिदम हार्ट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल -अकलूज, कोकाटे क्लिनिक -बार्शी, ओमेगा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल - अहिल्यानगर, बार्शी कॅन्सर केअर-बार्शी, इम्प्लस सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल-अहिल्यानगर,यांच्या सौजन्याने

**मोफत सुपर स्पेशालिटी शिबीर**
**शिबीराची वेळ:-सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत**

सुप्रसिध्द तज्ञ डॉक्टर्स

**डॉ.रोहन हेगडे**
MBBS,MD Medicine
DBN Cardiology
हृदयरोग तज्ञ
रिदम हार्ट ॲन्ड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल-अकलूज

**डॉ.अतुल कोकाटे**
मानसउपचार व मेंदू विकार तज्ञ
कोकाटे क्लिनिक-बार्शी

**डॉ.राहुल जाधव**
MD(Med) DM(Gastro)
(Sion Hospital,Mumbai)
पोट विकार तज्ञ
ओमेगा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल-अहिल्यानगर

**डॉ.अशिष बनपूरकर**
MBBS MD(Paeds)
DNB(Paediatric Cardiology)
नवजात शिशु हृदयरोग तज्ञ
विश्वराज हॉस्पिटल पुणे

**डॉ.रामप्रसाद धरणगुत्ती**
MBBS D'Ortho
अस्थीरोग तज्ञ
विश्वराज हॉस्पिटल पुणे

**डॉ.दर्शन गौड**
MBBS,MS (Gen.Surgery)
MCH (Neuro Surgery)
न्यूरो सर्जन
विश्वराज हॉस्पिटल पुणे

**डॉ.अभिजीत कोकाटे**
DM (Medical Oncology)
कॅन्सर तज्ञ
बार्शी कॅन्सर केअर-बार्शी

**डॉ.शिवाजी साळुंखे**
DNB (Surgical Oncology)
Cancer Surgeon
कॅन्सर सर्जन
बार्शी कॅन्सर केअर-बार्शी

**डॉ.महेश घुगे**
DNB Surgeon
सर्जन व मुळव्याध तज्ञ
इम्प्लस हॉस्पिटल-अहिल्यानगर

**डॉ.सनेश गर्दे**
MBBS DTCD
पल्मोनोलॉजी (फुफ्फुसाचे तज्ञ)
विश्वराज हॉस्पिटल-पुणे

**डॉ.रोहन प्रदीप पाटील**
M.B.B.S. (M.D.Physician)
FCPS Medicine
हृदयरोग व मधुमेह तज्ञ
जाधव-पाटील हॉस्पिटल-करमाळा

**डॉ.सौ.शिवानी रोहन पाटील**
M.B.B.S.,M.D.Pathology
जिजाऊ पॅथॉलॉजि लॅब
जाधव-पाटील हॉस्पिटल-करमाळा

: शिबीराचा लाभ कुणी घ्यावा :
हृदयाचे आजार (लहान मुले व मोठी व्यक्ति) । फुफ्फुसाचे आजार । कॅन्सरचे आजार । मानसिक आजार । पोटाचे आजार । मेंदूचे आजार । मणक्यांचे आजार । हाडांचे आजार । सांधेदुखीचे आजार । मुळव्याध,हर्निया,ॲपेंडिस आजार

टिप :- माईर्स विश्वराज हॉस्पिटल पुणे अंतर्गत **मोफत बालहृदय शस्त्रक्रिया**
हृदयाला छिद्र असणे । छिद्र डिव्हाईसच्या साहाय्याने बंद करणे । सर्व प्रकारच्या हृदयाच्या शस्त्रक्रिया

अधिक माहितीसाठी संपर्क :- Ph.No.(02182) 299 611
Mo.7559214551 / 8329459591 / 7887578152 / 7507314133
स्थळ- जाधव-पाटील हॉस्पिटल,अर्बन बँक शेजारी,मेन रोड,करमाळा,जि.सोलापूर.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
उपलब्ध सुविधा.. ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

## नाईकनिंबाळकर क्रिडा संकुल व आधुनिक व्यायाम शाळेचे उद्घाटन



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील खंडोबा मंदिराच्या मागे भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या माध्यमातून मा.खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर क्रिडा संकुल व आधुनिक व्यायाम शाळेचे उद्घाटन पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे हस्ते झाले. यावेळी तालुक्यातील महाराष्ट्र केसरी, उपमहाराष्ट्र केसरी, महाराष्ट्र चॅम्पियन तसेच इतर पैलवान ज्येष्ठ वस्ताद मंडळी उपस्थित होते.

यावेळी गणेश चिवटे म्हणाले, की आमचे सहकारी मित्र अफसर जाधव यांच्या माध्यमातून आम्ही मा.खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या नावाने क्रिडा संकुल व आधुनिक व्यायामशाळा तालुक्यातील मल्लांना उपलब्ध करून दिलेली आहे. या क्रिडा संकुलामध्ये सर्व सोयीसुविधा देऊन उत्कृष्ट असे मल्ल घडवू; असे सांगितले.

यावेळी पोलीस निरीक्षक घुगे यांनी सदरचे क्रिडा संकुल तालुक्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एक आदर्श क्रिडा संकुल म्हणून भविष्यामध्ये नावारूपाला आलेले दिसेल. क्रिडा संकुलास तालुक्यातील मल्लांनी प्रतिसाद द्यावा. कोणत्याही प्रकारचे व्यसन न करता एक आदर्श व निरोगी पैलवान घडावेत व भविष्यात करमाळा तालुक्यातील मल्ल महाराष्ट्र केसरी सारख्या गदेचे मानकरी व्हावे; असे मत व्यक्त केले. या उद्घाटप्रसंगी महाराष्ट्र केसरी चंद्रहास निमगिरे, भाजपा तालुका अध्यक्ष रामा ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, माजी नगराध्यक्ष कन्हैयालाल देवी, पै.सुनील सावंत, पै.अनिल फाटके, माजी उपनगराध्यक्ष सोमनाथ चिवटे, वस्ताद जालिंदर जाधव, आदमभाई शेख, आजिनाथ कोलेकर, देवराव चौधरी, मारूतीराव जाधव, भगवानगिरी गोसावी, काकासाहेब सरडे, अभिजीत मुरूमकर, अमोल पवार, नितीन झिंजाडे, सोमनाथ घाडगे, लक्ष्मण शेंडगे, मोहन शिंदे, अनिल जाधव, माजी नगरसेवक प्रविण जाधव, सचिन घोलप, विजय घोलप, विजय लावंड, प्रशांत ढाळे, अतुल फंड, दादासाहेब इंदलकर, नानासाहेब मोरे, बंडू शिंदे, विष्णू रणदिवे, सचिन गायकवाड, जयंत काळे-पाटील, भैय्या गोसावी, हर्षद गाडे आदी उपस्थित होते.

## लेखक जगदीश ओहोळ यांच्या पुस्तकाला नेल्सन मंडेला पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : हिसरे येथील रहिवाशी असलेले युवा लेखक जगदीश ओहोळ यांनी लिहिलेल्या 'जग बदलणारा बापमाणूस' या पुस्तकाला जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने 'नेल्सन मंडेला' पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'जग बदलणारा बापमाणूस' हे नव्या पिढीला, नव्या भाषेत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगणारे मोटिवेशनल पुस्तक आहे. अगदी कमी कालावधीमध्ये अधिकाधिक प्रतींची विक्री होऊन या पुस्तकाने मराठी साहित्य विश्वात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. विशेष म्हणजे या पुस्तका च्या दहाव्या आवृत्तीचे प्रकाशन अमेणिकेतील कोलंबिया विद्यापीठात झाले आहे. कोलंबिया विद्यापीठात प्रकाशित होणारे 'जग बदलणारा बापमाणूस' हे पहिले मराठी पुस्तक ठरले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे सदस्य डॉ.राजेश गायकवाड, जागतिक आंबेडकरवादी महामंडळाचे अध्यक्ष डॉ.दिपक खोब्रागडे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.जगन कराडे, साहित्यिक डॉ.विद्याधर बनसोडे सह मान्यवर, वाचक, श्रोते उपस्थित होते.

## चांदणेवस्ती येथे तीव्र पाणीटंचाई - पाण्याचा टँकर सुरू करण्याची मागणी

करमाळा(सं.प्र.) : देवळाली येथील चांदणेवस्ती येथे तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून या वस्तीवर पाण्याचा टँकर चालू करावा; अशी मागणी नागरीकातून केली जात आहे. चांदणे वस्ती येथे ३५० लोकसंख्या असून या वस्तीला एका विहिरीतून पाणीपुरवठा होत आहे. परंतु सदर विहिरीतून भिलवस्ती, झोळे वस्ती, जगताप वस्ती, कानगुडे वस्तीलाही पाणी उपसा केला जात असल्याने सदर विहिरीचे पाणी आटलेले आहे. त्यामुळे येथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. सध्या या वस्तीवरील लोक विकत पाणी घेत आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून या वस्तीसाठी शासनाने पाण्याचा ट्रँकर सुरू करावा; अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य किसन चांदणे, विकास राखुंडे यांनी केली

श्री गजानन अगरबत्ती
● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशनस् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

**मस्कर अ‍ॅग्रो सर्व्हिसेस**
व
**सर्व सेवा केंद्र**
**मस्कर ट्रेडिंग कंपनी**
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

# मुल्य शिक्षण संवर्धन प्रतियोगितेमध्ये नवभारत इंग्लीश स्कुलचे यश



करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल मध्ये आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ इस्कॉन तर्फे जगातील सर्वात मोठी मुल्य शिक्षण संवर्धन प्रतियोगिताचे आयोजन केले होते. मुलांनी जर योग्य नितीमुल्य आत्मसात केली तर मुलांचे भविष्य उज्वल होऊ शकते आणि मुलांचा भविष्यकाळ उज्वल करण्याचा हा प्रयत्न जो इस्कॉन मार्फत केला गेला, यामध्ये नवभारत इंग्लिश मेडियम स्कुल मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या प्रतियोगितेचे आयोजन सोमनाथ अभंग, ज्योती अभंग, धीरज पाटील यांनी केले होते. यामध्ये इ.८ वी ते १० वी गटात तनिष्का बागल, समृध्दी गावडे, नभा वाशिंबेकर यांनी तर इ.४ थी ते ७ वीच्या गटात आरोही खळदकर, ऋतुराज पवार, प्रतिज्ञा भोसले या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विशेष म्हणजे करमाळा तालुक्यामधून तनिष्का बागल ही पहिला नंबर मिळवणारी विद्यार्थीनी ठरली आहे. सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रकही देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन स्कुलच्या सर्वेसर्वा सुनिता देवी, मुख्याध्यापिका अश्विनी क्षीरसागर व सर्व शिक्षक यांनी केले.

कै.डॉ.प्रदीपकुमार (आबा) जाधव-पाटील यांच्या
शुक्रवार दि.१८ एप्रिल २०२५ रोजी असणाऱ्या जयंती निमित्त
आई कमला भवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था करमाळा, जाधव-पाटील हॉस्पिटल करमाळा व
**जिजाऊ पॅथॉलॉजि लॅब**
लॅब टेस्ट 50% सवलतीच्या दरात
यांच्या सौजन्याने
फक्त ४००रु. सवलतीच्या दरात पुढील लॅब टेस्ट (रक्ताच्या चाचण्या) करुन मिळतील.
• CBC • BSLR • KFT • Lipid Profile
कालावधी दि.१५ ते २० एप्रिल २०२५ पर्यंत
शिबीराची वेळ:-सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत
डॉ.शिवानी रोहन पाटील.एम.बी.बी.एस.,एम.डी.पॅथॉलॉजी
जिजाऊ पॅथॉलॉजी लॅब उपलब्ध सुविधा
24 तास सेवा
फ्रि होम कलेक्शन
- रक्त,लघवी,थुंकी,ब्लड ग्रुप
- सर्व स्पेशल संबंधीत टेस्ट (Thyroid, Vit. B12, Vit.D, HbA1c)
- प्रजनन चाचण्या-स्त्री व पुरुष
- पॅप स्मियर-स्त्री
- संधीवात तपासणी
- गाठीची तपासणी
- सर्व कॅन्सर संबंधीत तपासण्या
- २४ तास इमर्जन्सी सेवा
- फ्रि होम कलेक्शन
फुल बॉडी चेक-अप अल्पदरात सुविधा
अधिक माहितीसाठी संपर्क :- Ph.No.(02182) 299 611 / 8975676020
Mo.7559214551 / 8329459591 / 7887578152 / 7507314133
स्थळ- जाधव-पाटील हॉस्पिटल,अर्बन बँक शेजारी,मेन रोड,करमाळा,जि.सोलापूर.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात खुशखबर
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब • एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब • संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे • संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा • संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर • चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
• इंजेक्शन सुविधा • लेझर सुविधा
• प्रभावी औषधी सुविधा • मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
• मेडिक्लेम सुविधा उपलब्ध • पार्किंगची व्यवस्था
• आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# पाण्यासाठी टेल भागातील नागरीकांचा ७ एप्रिलला रास्ता रोको

करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांची वरदायिनी असलेल्या दहिगाव उपसासिंचन योजनेचे पाणी आवर्तन सुरु होऊन १५ दिवस झालेतरी अद्याप टेल भागात पाणी पोहोचलेले नाही. उजनी धरण वेगाने वजा पातळीकडे जात असताना जाणीवपूर्वक टेल भागाला डावलले जात आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी कुकडी डावा कालवा उपविभाग क्र.१२ च्या अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन टेल भागात पाणी न पोहोचल्यास ७ एप्रिलला रास्ता रोको आंदोलन केले जाईल; असा इशारा दिला आहे. निंभोरे गावचे लोकनियुक्त सरपंच रविंद्र वळेकर यांनी ग्रामपंचायत निंभोरे च्या वतीने हे निवेदन दिले आहे. या निवेदनात वळेकर यांनी म्हटले आहे, की रितसर पाणी मागणी अर्ज दिलेला असून २० मार्च रोजी सुरु झालेले दहिगाव



योजनेचे उन्हाळी अद्यापही टेल भागामध्ये पोहोचलेले नाही. योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये नसलेल्या गावांता सर्रास पाणी दिले जात आहे. टेल भागातील लव्हे, निंभोरे, घोटी इ. गावांना राजकीय द्वेष भावनेतून पाणी सोडण्यास टाळाटाळ केली जात आहे. सदर पाणी टेल भागास न मिळाल्यास ७ एप्रिलला करमाळा-कुर्डूवाडी रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे.

स्थलांतर.. ३० वर्षापासून आपल्या अखंड सेवेत.. स्थलांतर..
**शांतिसागर बँगल्स स्टोअर**
हे दुकान..... स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा येथे चालू आहे.
बांगड्याचे होलसेल व्यापारी
आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या लग्नासाठी लागणाऱ्या बांगड्या होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण !
संपर्क : मो.नं.9766075378
पत्ता : स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा

**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स**
होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी, पार्टीवेअर साडी, कॉटन साडी, लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर तसेच रेडीमेड ब्लाऊजच्या भरपूर व्हरायटीज मिळतील
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.
विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९९७२०९२...)

चौथे पुण्यस्मरण 6 April



कष्टाने संसार थाटला,
पण राहिली नाही साथ
तुझी आम्हाला..!
आठवण येते क्षणोक्षणी,
आजही वाट पाहतो आम्ही
पुर्नजन्म घ्यावा तु..
आमच्यासाठी..!

स्व.सौ.शारदा गोपाळ सावंत
(पुण्यस्मरण दि.६/४/२०२५)

## स्व.सौ.शारदा गोपाळ सावंत

यांच्या चौथे पुण्यस्मरणदिनानिमित्त त्यांचे स्मृतीस

**भावपूर्ण आदरांजली !**

आपले

गोपाळ अनंतराव सावंत, भगवान अनंतराव सावंत
दादासाहेब अनंतराव सावंत, विठ्ठल अनंतराव सावंत
ॲड.राहुल सुभाषराव सावंत, डॉ.संकेत गोपाळ सावंत

**सावंत परिवार, सावंतगल्ली, करमाळा.**



बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाचे

## लोकनेते भाऊसाहेब चॅरिटेबल ट्रेनिंग सेंटर

करमाळा., जि.सोलापूर





**पोकलेन मशीन ऑपरेटर ट्रेनिंग सेंटर** | **बॅकहू लोडर ऑपरेटर ट्रेनिंग सेंटर**

वरील ट्रेनिंग सेंटर करीता खालील पदे भरावयाची आहेत

| क्र. | पद | पात्रता | पदसंख्या |
| --- | --- | --- | --- |
| १ | जनसंपर्क अधिकारी | कोणत्याही शाखेची पदवी व चारचाकी वाहन लायसन्स आवश्यक | ०१ |
| २ | मार्केटींग ऑफिसर/सेल्समन | १२ वी पास | ०१ |

टीप :
- अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- मुलाखतीस मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर रहावे.

**मुलाखत : दि.१०/४/२०२५, वेळ : सकाळी ११.०० वा.**

संपर्क

अतुल ढवळे (9404274200)  हमीद काझी (8080508150)

**स्थळ : झाडबुके महाविद्यालय, करमाळा (बी.सी.ए.)**
हिवरवाडी रोड, करमाळा, जि.सोलापूर



## डॉ.साळुंके

## स्कीन केअर क्लिनीक

**त्वचा रोग निदान व उपचार**

**डॉ.रोहीत दिगंबरराव साळुंके**
B.A.M.S., D.Derma(Ay)(Pune)
सौंदर्य समस्या, त्वचा व केशविकार, ॲलर्जी
लैंगिक समस्या, गुप्तरोग तज्ञ



वेळ : सकाळी १०.०० ते दुपारी २.०० व सायं.४.०० ते ८.०० पर्यंत
(रविवारी सुट्टी राहील.)

नवीन पत्ता

**युनियन बँकेच्या शेजारी, कमलादेवी रोड, करमाळा.**
मो.नं.9404692188, 7387376531



स्थलांतर.. स्थलांतर.. स्थलांतर..

## शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस




फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर
सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे
एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे

**अधिकृत विक्रेते**





प्रोप्रा : अमरजित साळुंके
(मो.9823371457)

Finolex PLASSON

नवीन पत्ता

**बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.**


डॉ.साहिल साधना सुनिल अडसूळ
M.B.B.S. उत्तीर्ण
अश्विनी हॉस्पिटल, सोलापूर
डॉ.आदित्य (सनी) साधना सुनिल अडसूळ
M.B.B.S.
इंटरशिप कमला नेहरु हॉस्पिटल, पुणे
डॉ.सुनिल अडसूळ
हार्दिक अभिनंदन..!
शुभेच्छुक :
समस्त अडसूळ, पाटील, वारे, झोळ, पोळ, जाधव, ठोगे -पाटील, सूर्यवंशी, खेडकर, चव्हाण, बागल, जगताप, शिंदे,लाळगे, शिर्के, वाघमारे, काळे -पाटील परिवार व समस्त ग्रामस्थ भोसे.
समस्त अडसूळ हॉस्पिटल स्टाफ, करमाळा.


आशिर्वाद
आमदार साहेब
खासदार
लोकनियुक्त सरपंच
लोकनियुक्त सरपंच
चेअरमन, चिखलठाण सोसा.
चिखलठाण विविध कार्यकारी सेवा सोसायटीची
१००टक्के कर्ज वसुली
झाल्याबद्दल
चेअरमन व संचालकांचे..
हार्दिक अभिनंदन !
श्री.विकास (बापू) गलांडे
शुभेच्छुक
चिखलठाण ग्रामपंचायत व विविध कार्यकारी सेवा सोसायटी चिखलठाण

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह


| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
Reg no.42433
पाटील
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
- त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, बांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
- केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
- सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे
- सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार




पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

## गेल्या आठ दिवसात करमाळा तालुक्यातून तीन तरूणी बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : गेल्या आठ दिवसात करमाळा तालुक्यातून तीन तरूणी बेपत्ता झालेल्या आहेत. यामध्ये श्रीदेवीचामाळ येथील १९ वर्षाची तरूणी ३१ मार्चला घरातून निघून गेली आहे. तसेच २८ मार्चला झरे येथील १८ वर्षाची युवती बेपत्ता झाली आहे. तर २५ मार्चला नेरले येथील २१ वर्षाची तरूणी बेपत्ता झाली आहे. अशाप्रकारे तीन तरूणी राहत्या घरातून स्वत:हून निघून गेल्या आहेत. या प्रकरणी करमाळा पोलीसात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत वृध्द महिला जागीच ठार

करमाळा (सं.प्र.) : टमटमला अज्ञात वाहनाने धडक देऊन झालेल्या अपघातात ७५ वर्षाची वृध्द महिला ठार झाली आहे. हा अपघात ३१ मार्च ला सायंकाळी सहाच्या सुमारास जेऊर-टेंभूर्णी रस्त्यावर पांगरे जवळील लोकविकास डेअरी समोर घडला आहे. या प्रकरणी श्रीकृष्ण चंद्रकांत शिंदे (रा.भाळवणी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३१ मार्च ला सायंकाळी सहाच्या सुमारास माझी आत्या मालन मधुकर वाघमारे (वय-७५) ही टमटम मधून भाळवणीकडे येत असताना टमटमला पाठीमागून अज्ञात वाहनाने धडक दिली. त्यातून माझी आत्या खाली पडली आणि तिच्या डोक्यावरून अज्ञात वाहन गेल्याने ती जागीच ठार झाली. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## बेकायदेशीर वाळू चोरी प्रकरणात दोघांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा : आवाटी हद्दीतून जेसीबीच्या सहाय्याने बेकायदेशीर वाळू चोरी करून संतोष गायकवाड व रणजित मंडळकर व अन्य दोघेजण चालले असताना त्यांना रंगेहाथ पकडले आहे. रंगेहाथ पकडल्यानंतर त्यांच्यावर कर्मचाऱ्यांच्या शासकीय कामकाजात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार आवाटी येथे ३० मार्चला रात्री एक वाजता घडला आहे. नेरले गावचे कोतवाल शिवाजी श्रीमंत काळे यांनी फिर्याद दिली आहे.

## पिकअपची मोटारसायकलला धडक - मोटारसायकलवरील दोघेही ठार

करमाळा(सं.प्र.) : पिकअपने मोटारसायकलला धडक देऊन झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील दोघेही ठार झाले आहेत. हा प्रकार २५ मार्चला सायंकाळी आठच्या सुमारास कुंभारगावच्या जवळ घडलेला आहे. या प्रकरणी तुषार कैलास ठेंबे (रा.सावडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझे वडील कैलास जगन्नाथ ठेंबे व त्यांचे मित्र श्रीराम दत्तू मांढरे हे मोटारसायकलवरून सावडीहून कुंभारगावकडे जात होते. त्यावेळी पिकअप चालक केशव सतीश जाधव (रा.सावडी) याने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व अविचाराने चालवून मोटारसायकलला समोरून धडक दिली. त्यात माझे वडील व त्यांचे मित्र दोघेही गंभीर जखमी होऊन त्यातच त्यांचे निधन झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी टेम्पो चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## टेम्पोची सायकलस्वारास धडक - सायकलस्वाराचे निधन

करमाळा(सं.प्र.) : सायकलीवरून मांगी गावाकडे येत असताना पाठीमागून येणाऱ्या आयशरने धडक देऊन झालेल्या अपघातात सुभाष नामदेव शिंदे (रा.मांगी) यांचे निधन झाले आहे. या प्रकरणी योगेश सुभाष शिंदे (रा.मांगी) यांनी फिर्याद दिली आहे. हा अपघात २८ मार्चला सकाळी दहा च्या सुमारास घडला आहे. २८ मार्चला सकाळी दहाच्या सुमारास माझे वडील सुभाष नामदेव शिंदे हे सायकलवरून गावाकडे येत असताना पाठीमागून येणाऱ्या आयशर टेम्पो क्र.एमएच १६ सीडी ३६७२ च्या चालकाने निष्काळजीपणे आयशर चालवून माझ्या वडीलांच्या सायकलला पाठीमागून धडक देऊन गंभीर जखमी केले. त्यांना उपचारास नेले असताउपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी आयशर टेम्पो चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.)
यांचा
अनुजा
दातांचा दवाखाना





वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

उपलब्ध सुविधा...
- स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
- पोर्टेबल एक्स-रे
- वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
- लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
- दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
- वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
- दात काढणे
- शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
- इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
- दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
- डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
- पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
- जबड्याच्या आजारांचे निदान
- रूट कॅनल ट्रीटमेंट
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
- पुढील दातांमधील गॅप बंद करणे
- अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
- दात पांढरे/शुभ्र करणे
- इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
- तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
- मुख कर्करोग निदान





कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

## श्रीरामदूत हनुमान जन्मभूमी कुगाव चे 'भीमा महात्म्य' या पौराणिक ग्रंथातील अध्याय ३३ चे

# मराठी भाषांतर


कुगाव येथील पुरातन हनुमानाचे मंदिर




कुगाव येथील जीर्णोधारीत हनुमानाचे मंदिर




श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरूभ्योनमः ॥ श्रीमातापितृभ्यांनमः ॥
श्रीभीमाशंकरायनमः ॥ ॐनमोजीआदिपुरुषा ॥ जगद्वंद्यामायाविलासा ॥ गौरी
रमणाधर्माध्यक्षा ॥ अनंतनामाजगत्पते ॥ १ ॥ सर्वदेवांमाजीश्रेष्ठ ॥ विरक्तांमा
जीवरिष्ठ ॥ प्रलयाग्नीवतकोपिष्ठ ॥ आजनुबाहु ॥ २ ॥ सर्वजगातेंपालनकरिसी ॥
पापिष्ठजनांउद्धरिशी ॥ नामानामातीतअससी ॥ पार्वतीरमणा ॥ ३ ॥ साधुजनां
चेंपालनकरिशी ॥ दुष्टजनांतेंशिक्षालाविशी ॥ भजकांलागींप्रसन्नहोशी ॥ गणअ
सतीसेवेशीतुझ्या ॥ ४ ॥ सूतम्हणेशौनकादिकांसी ॥ पुढेंश्रवणकराहनुमत्तीर्थम
हिमेसी ॥ विधिसांगेनारदासी ॥ चरित्रश्रवणकरीपुढें ॥ ५ ॥ दुसरेंअसेकूर्मतीर्थ ॥
कूर्मग्रामअसेविख्यात ॥ स्मरणेंभुक्तिमुक्तिहोतीप्राप्त ॥ स्नानमात्रेंकार्यसिद्धी ॥ ६ ॥
त्याकूर्मनामकग्रामात ॥ वीतहव्यनामकऋषिख्यात ॥ तपश्चर्याहोताकरीत ॥ ए
कनिष्ठेंकरूनियां ॥ ७ ॥ भीमातीराचियेठाईं ॥ तोकूर्मग्रामअसेपाहीं ॥ तेथेंतोतप
करीवीतहव्यही ॥ विष्णुध्यानकरीतसे ॥ ८ ॥ ब्राह्मणाचानाशकरावयाशी ॥ मधु
कैटभशोणिताक्षी ॥ प्राप्तजाहलेतेस्थानाशी ॥ महाक्रोधेंकरूनियां ॥ ९ ॥ तयांतें
करितांअवलोकन ॥ कूर्मरूपधरिलेंविष्णून ॥ सुदर्शनचक्रेंकरून ॥ तयांअसुरां
मारिलें ॥ १० ॥ तेथेंजाहलेंकूर्मतीर्थ ॥ त्यांतभक्तीनेंजोस्नानकरित ॥ तयाचेमान
सिकसंपूर्णहेत ॥ पूर्णहोतीतात्काळीं ॥ ११ ॥ तेथेंकरितांतर्पण ॥ नरकींअसतीज
रीपितृगण ॥ तात्काळमुक्तहोवोन ॥ स्वर्गींनांदतीसौख्यानें ॥ १२ ॥ त्याकूर्मग्रामीं
दुसरेंतीर्थ ॥ नामअसेहनुमंत ॥ तयाचेंजोस्मरणकरित ॥ तयासीमुक्तीप्राप्तहोई ॥
॥ १३ ॥ सूतम्हणेशौनकादिकांसी ॥ त्याचेंतीर्थम्यांतुम्हांसी ॥ सांगतोंऐकाएकभा
वेंसी ॥ भुक्तिमुक्तीलाधती ॥ १४ ॥ इंद्रलोकींच्याअप्सरेसी ॥ शापप्राप्तझालापरि
येसीं ॥ वानरस्वरूपजाहलेंतीसी ॥ नामअसेअंजना ॥ १५ ॥ तीसौख्येंकूर्मक्षेत्रीं ॥
तीर्थस्थानींवासकरी ॥ ऋतुप्राप्तझालाएकेअवसरीं ॥ चिंताकरीमानसीं ॥ १६ ॥ को
णकरीलऋतुकालपूर्ण ॥ इतुक्यांतवायूयेवोन ॥ भोगदेईतिजलागून ॥ गर्भवतीजाह
ली ॥ १७ ॥ नवमासभरतांपरिपूर्ण ॥ पुत्रजाहलाहनुमान ॥ तेणेंलंकेंतजावोन ॥ राक्ष
ससंपूर्णवधियेले ॥ १८ ॥ तेथेंकृतकार्यहोवोनी ॥ पुनरपीपूर्वस्थानींयेवोनी ॥ वासकरीशि
वध्यानीं ॥ रतअसेनिरंतर ॥ १९ ॥ तेथेंजाहलेंहनुमत्तीर्थ ॥ पापीजनांतेंमुक्तकरि
त ॥ तयाचेंजेसेवनकरित ॥ पापमुक्तहोतीते ॥ २० ॥ तयाचेंजेघेतीदर्शन ॥ तयां
चेहेतूहोतीपूर्ण ॥ एकोनतीसलक्षलिंगेंजाण ॥ तयातीर्थीआसती ॥ २१ ॥ इंद्रादिक
सुरवर ॥ वसिष्ठादीऋषीश्वर ॥ सिद्धचारणगुह्यककिन्नर ॥ सेवाकरितीतीर्थाची ॥
॥ २२ ॥ ब्रह्मदेवम्हणेनारदासी ॥ भैरवतीर्थाचियेमहिमेसी ॥ श्रवणकरीएकचित्तें
सी ॥ पापनाशकतीर्थतें ॥ २३ ॥ भुक्तिमुक्तिपदजाण ॥ सर्वपापाचेंनाशन ॥ सर्व
रोगांकरीशमन ॥ सिद्धिदायकअसेतें ॥ २४ ॥ तयाचासांगाइतिहास ॥ नारदम्ह
णेब्रह्मदेवास ॥ तात्काळआलाउल्हास ॥ ब्रह्मदेवाकारणें ॥ २५ ॥ चतुर्भुजनाराय
ण ॥ सृष्टिकर्ताब्रह्मदेवजाण ॥ मायेनेंमोहितहोऊन ॥ परस्परबोलती ॥ २६ ॥ ज
गतामाजीमीचश्रेष्ठ ॥ मजहूनिअन्यनसेवरिष्ठ ॥ परस्परम्हणतीमीचश्रेष्ठ ॥ संवाद
करितीयेणेंपरी ॥ २७ ॥ देवांसिविचारितीतेकाळीं ॥ आम्हांहूनीकोणबळी ॥ वस
तअसेयाभूमंडळीं ॥ तेआम्हांलागींनिवेदावें ॥ २८ ॥ देवम्हणतीब्रह्मविष्णूसी ॥ शं
करश्रेष्ठअसेकैलासीं ॥ ऐसाऐकतांवचनासी ॥ विधिवैकुंठक्रोधावले ॥ २९ ॥ निंदा
करितीशंकराची ॥ उरगभूषणेंअसतीत्याचीं ॥ आवडीअसेस्मशानाची ॥ तयानी
चाकारणें ॥ ३० ॥ ऐसेंबोलोनियांवचन ॥ विधीचेंपंचमशिरकरीगर्जन ॥ तांध्व
नीशिवेंऐकोन ॥ क्रोधायमानजाहला ॥ भयंकरधरिलीआकृती ॥ तयातेंभैरवना
मनिश्चिती ॥ जोंइंद्रियेंअपराधकरिती ॥ तयांचानाशकरीतसे ॥ ३१ ॥ ब्रह्मदेवाचें
पंचमशिर ॥ नखेंछेदिताझालाशंकर ॥ तात्काळजाहलाहाहाःकार ॥ गर्वरहितहोय
ब्रह्मा ॥ ३२ ॥ भीमातीर्थाचियेतीरीं ॥ भैरवयेवोनिवास्तव्यकरी ॥ नामेंभैरवतीर्थ
निर्धारीं ॥ प्रसिद्धतेथेंजाहलें ॥ ३३ ॥ तेथेंकरितीस्नानदान ॥ जेकरितीभक्तीकरू
न ॥ तयांचेहेतूसंपूर्ण ॥ पूर्णहोतीतात्काळीं ॥ ३४ ॥ तेथेंअसेकोटिलिंग ॥ तेथेंजे
करितीकर्मसांग ॥ तयांतेंसौख्यलागवेग ॥ प्राप्तहोईनिर्धारीं ॥ ३५ ॥ त्याकोटीश्व
रेंजाण ॥ क्षेत्रचिखलनामकस्थापून ॥ तेथेंवासकरीआपण ॥ महानंदेंकरूनियां ॥
॥ ३६ ॥ नारदम्हणेब्रह्मदेवासी ॥ कोटीश्वरेंकांस्थापिलेंक्षेत्रासी ॥ सांगामजत्याइ
तिहासासी ॥ विचारीतसेंनम्रत्वें ॥ ३७ ॥ ब्रह्मदेवम्हणेनारदासी ॥ त्याचिखलना
मकस्थानासी ॥ पृथ्वीपतीचिखलपरियेसीं ॥ तपाचरणकरीतसे ॥ ३८ ॥ कोटीश्व
रांचेंकरीध्यान ॥ तपकरीतसेदारुण ॥ कोटिलिंगजालेंप्रसन्न ॥ वरमागम्हणेत्यातें ॥
॥ ३९ ॥ जरीप्रसन्नझालासीदेवा ॥ मजलागींऐसावरद्यावा ॥ ममनामेंग्रामप्रसिद्ध
व्हावा ॥ तीर्थहीव्हावेंतैसेंची ॥ ४० ॥ तथास्तुम्हणेकोटेश्वर ॥ ऐसादेवोनितयावर
अंतर्धानपावेसत्वर ॥ सूतम्हणेशौनकादिकां ॥ ४१ ॥ तेस्थानींजेस्नानकरिती ॥
तयांभुक्तिमुक्तीप्राप्तहोती ॥ दर्शनेंमिळेविपुलसंपत्ती ॥ अखिलसौख्यप्राप्तहोई ॥
॥ ४२ ॥ सूतम्हणेशौनकादिकांसी ॥ विधीनेंसांगीतलेंनारदासी ॥ तेंचरित्रम्यांतुम्हां
सी ॥ यथामतीनिवेदिलें ॥ ४३ ॥ रामाश्रयेंकरूनिजाण ॥ याग्रंथाचेंलेखन ॥ तें
सेंचिदत्तकृपेन ॥ केलेंअसेमान्यअसो ॥ ४४ ॥ इतिश्रीपद्मपुराणे उत्तरसंहितांतर्ग
त भीमाचरित्रे सूतकथितकथाकल्पतरौ कूर्मतीर्थहनुमत्तीर्थभैरवतीर्थकोटीश्वरती
र्थमहिमावर्णनंनामत्रयस्त्रिंशत्तमाध्यायगोडहा ॥ ३३ ॥ ओंव्यासंख्या ॥ २०३५ ॥

॥ भीमामहात्म्य अध्याय ३३ ॥

## मराठी भाषांतर

श्री गणेशाय नम: ॥ श्री सरस्वती देवी नम: ॥ श्री गुरूभ्यो नम: ॥ श्री मातापिताय नम: ॥ श्री भीमाशंकराय नम: ॥
ॐ आदिपुरूषाय नम: ॥ जगत्माता विलासा वंदन असो ॥ गौरीरमनाच्यक्षा ॥ अनंतानामा जगत्पते ॥१॥
सर्वश्रेष्ठ देवा, विरंकत्यांमधील श्रेष्ठा, प्रलय-अग्निसमकोपिष्ठ, गुडघ्यापर्यंत हात असलेला ॥२॥
सर्व जगताचे पालन करतोस, पापी जनांचा उध्दार करतोस, नाम-अनामाच्या पलीकडे असतोस, पार्वतीचा पती ॥३॥
साधुसज्ञनांचे पालन करतोस, दुष्टजनांना शिक्षा करतोस, भजन करणाऱ्यांना प्रसन्न होतोस, तुझ्या सेवेला गण असतात ॥४॥
शौनकऋषींना सुत सांगतात, पुढे हनुमन्ततीर्थमहिमा श्रवण करा, हा विधी नारदाला सांगत आहेत, पुढे चरित्र श्रवण करा ॥५॥
दुसरे कूर्मतीर्थ आहे, कूर्मग्राम प्रसिध्द आहे. त्याच्या केवळ स्मरणाने भुक्ति-मुक्ति प्राप्त होतात (कूर्मतीर्थावर) स्नानाने कार्यसिध्दी होते ॥६॥
त्या कूर्मग्राममध्ये वीतहव्य नावाचे ऋषी प्रसिध्द होते, ते तपश्चर्या करीत होते, एकनिष्ठपणे ॥७॥
भीमानदीच्या तीरावर कूर्मग्राम होते तेथे ते अव्याहतपणे तप करीत होते. भगवान विष्णूचे ध्यान करीत असे ॥८॥
मधुकैटभ राक्षस ब्राह्मणाचा नाश करण्यासाठी भयंकर क्रोधाने त्या ठिकाणी (कूर्मतीर्थ) आले ॥९॥
भगवान विष्णूने त्यांना पाहून कूर्मरूप धारण केले आणि सुदर्शन चक्राने त्या राक्षसाला ठार मारले ॥१०॥
तेथे कूर्मतीर्थ निर्माण झाले. तेथे भक्तिभावाने जे स्नान करतील त्यांचे मनोरथ तात्काळ पूर्ण होतील ॥११॥
त्या ठिकाणी तर्पण(श्राध्द) केले असता पितृगण(पूर्वज) नरकात असतील तरी तात्काळ मुक्त होवून स्वर्गामध्ये सुखाने राहतील ॥१२॥
कूर्मग्राममध्ये हनुमंततीर्थ नावाचे दूसरे तीर्थ आहे. त्याचे स्मरण करणारा मुक्ती पावेल ॥१३॥
शौनकऋषींना सुत म्हणतात, त्या तीर्थाचे महत्व तुम्हांस सांगतो, ते तुम्ही श्रध्देने ऐका. त्यापासून भुक्ती-मुक्तीचा लाभ होईल ॥१४॥
इंद्रलोकीच्या अप्सरेला शाप मिळाला. त्यामुळे तिला वानरीरूप मिळाले, तिचे नांव अंजना ॥१५॥
ती कूर्मक्षेत्रावर आनंदाने रहात होती. एकदा ऋतुप्राप्ती झाल्यावर ती मनात चिंता करीत होती ॥१६॥
तिची इच्छा(ऋतुकाल) कोण पूर्ण करील ? इतक्यात वायूदेवाने येवून तिला भोग दिला (इच्छा पूर्ण केली) ती गर्भवती झाली ॥१७॥
नऊ महिने पूर्ण होताच तिला पुत्र झाला तो हनुमान. त्याने लंकेत जाऊन राक्षसांचा वध केला ॥१८॥
तेथील कार्य पूर्ण झाल्यावर हनुमान पुन्हा पूर्वस्थानी येवून शिवाचे ध्यान करण्यात मग्न असे ॥१९॥
तेथे हनुमान तीर्थ निर्माण झाले. पापी जनांना मुक्त करण्यासाठी हनुमत्ततीर्थ सेवन करणारे पापातून मुक्त होतात ॥२०॥
हनुमत्ततीर्थाचे जे दर्शन करतील त्यांचे सकलहेतू पूर्ण होतील. हनुमत्ततीर्थावर एकोणतीस लक्ष शिवलिंग आहेत ॥२१॥
इंद्र आणि इतर देवता, वशिष्ठ ऋषी आणि इतर ऋषी सिध्दी, गुप्तज्ञान मिळवलेले किन्नर या तीर्थाची सेवा करतात ॥२२॥
ब्रह्मदेव नारदमुनींना सांगतात, भैरवतीर्थाचा महिमा एकचित्ताने, लक्षपूर्वक ऐका, ते पापनाशक तीर्थ आहे ॥२३॥
भुक्तिमुक्ति मिळवून देणारे, सर्व पापांचा नाश करणारे, सर्व रोगांचे शमन करणारे, सिध्दी प्राप्त करून देणारे हे तीर्थ आहे ॥२४॥
नारदमुनी ब्रह्मदेवास म्हणाले, त्याचा इतिहास सांगावा, ब्रह्मदेवांना देखील सांगण्याचा उत्साह आला ॥२५॥
चारभुजा असलेला (चतुर्भूज) नारायण, सृष्टीकर्ता ब्रह्मदेव मायेने मोहित होवून एकमेकांशी बोलू लागले ॥२६॥
जगामध्ये मीच सर्वश्रेष्ठ आहे, माझ्यापेक्षा वरीष्ठ कोणीच नाही. परस्परांना मीच श्रेष्ठ म्हणू लागले ॥२७॥
देवांनाही ते तेंव्हा विचारू लागले, या भूमंडळामध्ये आमच्यापेक्षा बलवान कोण आहे ? ते आम्हाला सांगावे ॥२८॥
देव ब्रह्माविष्णूंना म्हणाले, कैलास पर्वतावर शंकर श्रेष्ठ आहेत. देवांचे हे बोलणे ऐकून विधी वैकुंठपती संतापले ॥२९॥
ते शंकराची निंदा करू लागले, कवट्यांची माळ धारण करतो, स्मशानामध्ये राहतो (स्मशानाची आवड आहे) तो नीच आहे ॥३०॥
असे बोलून ब्रह्मदेवाचे पाचवे शीर गर्जना करू लागले. त्याचा आवाज ऐकून भगवान शिव संतप्त झाले. त्यांनी भयंकर रूप धारण केले, त्याचे नाव भैरव. ज्या इंद्रियांनी अपराध केला,त्यांचा(भैरावने) नाश केला ॥३१॥
ब्रह्मदेवाचे पाचवे शिर (मस्तक) नखे शंकराने छेद केला. तेथे हाहाकार झाला, ब्रह्मदेवाचा गर्वनाश झाला ॥३२॥
भीमातीराच्या तीर्थावर भैरवाने येवून वास्तव्य केले. ते तीर्थ भैरवतीर्थ म्हणून प्रसिध्द झाले ॥३३॥
तेथे जे भक्तीपूर्वक स्नान-दान करतात त्यांचे सगळे हेतू तात्काळ पूर्ण होतात ॥३४॥
तेथे कोटलिंग तीर्थ आहे. ते जे कार्य करणाऱ्यांना निश्चितपणे सौख्य प्राप्त होते ॥३५॥
त्या कोटिश्वराने जाणून, चिखलक्षेत्राच्या नावाने स्थापना करून महानंदेसह (पार्वती) राहू लागले ॥३६॥
नारदमुनी ब्रह्मदेवास म्हणतात, या क्षेत्री कोटिश्वराची स्थापना का झाली, त्याचा इतिहास मला सांगा असे नारदमुनी नम्रपणे विचारतात ॥३७॥
ब्रह्मदेव नारदाला सांगतात, त्या चिखल नावाच्या ठिकाणी पृथ्वीपती तपाचरण करतात ॥३८॥
कोटीश्वराचे ध्यान करून भयंकर तप करतात. कोटीलिंगाने प्रसन्न होवून वर मागण्यास सांगितले ॥३९॥
देवा, मला प्रसन्न झाला असालतर मला असा वर द्यावा की माझ्या नावाने गाव प्रसिध्द व्हावे, ते तीर्थक्षेत्र व्हावे ॥४०॥
कोटेश्वर तथास्तु म्हणाले, वर देऊन ते अंतर्धान पावले. शौनऋषींना सूत म्हणाले ॥४१॥
त्या ठिकाणी जे स्नान करतात त्यांना भुक्ति-मुक्ति प्राप्त होतात, दर्शनाने भरपूर संपत्ती मिळते, सर्व सुख प्राप्त होतात ॥४२॥
शौनकऋषींना सूत म्हणाले, ब्रह्मदेवाने नारदाला सांगितले ते चरित्र मी तुम्हाला माझ्या मतीप्रमाणे (बुध्दीप्रमाणे) निवेदन केले ॥४३॥
श्रीरामाच्या आश्रयाने जाणून या ग्रंथाचे लेखन श्री दत्तकृपेने केले ते मान्य असावे ॥४४॥

**याप्रमाणे श्रीमद्मपुराणातील उत्तरसंहिता अंतर्गत भीमाचरित्र सूतांनी सांगितलेली कथाकल्पतरू कूर्मतीर्थ, हनुमत्ततीर्थ, भैरवतीर्थ, कोटीश्वरतीर्थ महिमा वर्णन नाम तेहतीसावा अध्याय गोडा हा ॥ अध्याय ३३ ॥**

**संकलन : सौ.तेजस्वीनी दयानंद कोकरे**
माजी सरपंच, ग्रामपंचायत कुगाव, ता.करमाळा.
प्रमुख विश्वस्त, कूर्मतीर्थ कुगाव, ता.करमाळा

# शेती विकणे आहे


बारमाही बागायत असणारी संगोबा बंधाऱ्याच्या लाभ क्षेत्रामधील बोरगाव हद्दीतील सलग साडेदहा एकर शेती किंवा तुम्हाला हवे तसे क्षेत्र योग्य किंमतीत विकणे आहे.

**संपर्क : मो.9623768380**


## शेलगाव क येथे 'सन्मान गावाचा- सत्कार शिलेदारांचा' कार्यक्रम संपन्न

करमाळा(सं.प्र.) : गुढीपाडव्या निमित्त शेलगाव क येथे ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या शेलगाव क कृषी क्रांती गटाचा सत्कार तसेच वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या नागरीकांचा सत्कार 'सन्मान गावाचा – सत्कार शिलेदारांचा' या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील हे उपस्थित होते. तर व्यासपीठावर सरपंच यमुना वीर, उपसरपंच लखन ढावरे , माजी सरपंच अशोक काटुळे, आत्माराम वीर, माजी उपसरपंच सचिन पाटील, सत्कारमूर्ती प्रा.प्रकाश काटुळे, ग्रामसेवक महेश काळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी तलवारबाजी खेळाच्या माध्यमातून ठसा उमटविणारे प्रा.प्रकाश काटुळे, शेलगाव क गावात ग्रामस्वच्छता, जलसंधारण व वृक्षसंवर्धन-ची चळवळ रूजविणारे ग्रामसेवक महेश काळे व फार्मर कप स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश मिळविल्या-बद्दल शेलगाव क कृषी क्रांती गटाचा विशेष सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून एसटीआय, कृषी अधिकारी पद मिळविणारे व वकील, प्राध्यापक, शिक्षक, हवालदार, केंद्रीय सुरक्षा बल, भारतीय रेल्वे इ. विभागात सेवा करणारे तसेच इंजिनियरींग, डॉक्टरसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी, शिष्यवृत्ती व क्रिडा स्पर्धेत उल्लेखनीय काम केलेले विद्यार्थी यांचा ही सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात रोहिणी वीर, गंगा काटुळे, अशोक काटुळे, प्रकाश काटुळे, महेश काळे, पोपट शिंदे, सायली पायघन यांनी मनोगत व्यक्त केल. प्रास्ताविक डॉ.विकास वीर यांनी तर सुत्रसंचालन उदयसिंह काटुळे यांनी केले. उपस्थितांचे आभार ग्रामसेवक खाडे यांनी मानले.

## संस्कृत तज्ञ व वेदशास्त्र संपन्न नारायण जोशी यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : शहरातील किल्लाविभाग येथील रहिवाशी व संस्कृत तज्ञ तसेच वेदशास्त्र संपन्न असलेले नारायण गजानन जोशी (राजादेव) वय- ७५ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नारायण जोशी हे जुन्या काळातील सर्वोत्कृष्ट पंडित व पुरोहित होते. अनेक विवाह समारंभ व तालुक्यातील अनेक कार्यक्रमास त्यांनी पौरोहित्य केलेले आहे. स्वातंत्र्य सैनिक स्व.गोविंदशास्त्री जोगळेकर यांनी त्यांना भिक्षुकी विद्या शिकवली होती. अनेकांना त्यांनी भगवद्गीता, विष्णू सहस्त्रनाम, दुर्गा सप्तशती इ. चे शिक्षण दिले होते. विशेषत: राशीनपेठ येथील महिलांना त्यांनी संस्कृत भाषेमधून प्रशिक्षण दिले आहे. माजी आमदार देशभक्त नामदेवराव जगताप यांचे पासून ते थेट माजी मंत्री स्व.दिगंबररावजी बागल, माजी नगराध्यक्ष स्व.गिरधरदास देवी यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते. यावेळी दत्तात्रय देवालय समिती तर्फे श्रध्दांजली वाहण्यात आली. नारायण जोशी हे सोशल मिडीया पत्रकार अविनाश जोशी यांचे चुलते होते.

## अरूण(नाना) राजोपाध्ये यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



करमाळा(सं.प्र.): किल्ला विभाग येथील रहिवाशी अरूण(नाना) राजोपाध्ये (वय-७०) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. सेवानिवृत्त तलाठी मुकुंद राजोपाध्ये यांचे ते चुलत बंधू होते. दत्तात्रय देवालय समिती तर्फे त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.


प्रोप्रा : सुनील भिमशंकर चिवटे

**गुंडाप्पा फटाका स्टॉल**

नामवंत कंपनीचे...
- तोफा, कलर तोफा
- ६० शॉट, १२० शॉट, २४० शॉट
- कागदी शॉट
- एक हजारी माळ, दोन हजारी माळ पाच हजारी माळ इ.

फटाके होलसेल दरात मिळतील



शॉपिंग सेंटर, गाळा नं.६, सागर थिएटरच्या समोर, गायकवाड चौक, करमाळा.

संपर्क : मो.9850746608 / 9763635707



होमिओपॅथीचे जनक डॉ.हॅनेमन यांच्या जयंतीनिमित्त

# होमिओपॅथिक उपचार शिबीर

गुरूवार, दि.१०/४/२०२५ रोजी
सकाळी १०.०० ते ३.०० वाजेपर्यंत

**थायरॉइड** **उच्च रक्तदाब (ब्लड प्रेशर)**
**मधुमेह(डायबेटीस)** आजारांवर मोफत तपासणी व उपचार केले जातील.

थायरॉइड व साखर तपासणी ५०% सवलतीच्या दरात

शिबीरात दोन महिन्याचे होमिओपॅथिक औषधे मोफत दिले जातील.

शिबीरात सहभागी होण्यासाठी नावनोंदणी आवश्यक

- होमिओपॅथिक उपचारासाठी पेशंटची संपूर्ण माहिती लागते.
- पेशंटची मानसिक, शारिरीक व आजाराची संपूर्ण माहिती घेऊन योग्य औषधे दिली जातात.
- डॉक्टरांनी दिलेल्या सूचना योग्यरित्या पाळाव्यात.
- पेशंटचे जुने रिपोर्ट सोबत घेऊन येणे.

योग्य होमिओपॅथिक औषध उपचाराने आजार पूर्णपणे बरा होऊन सर्व औषधे बंद होतात.

शिबीर स्थळ

**डॉ.बिपीन परदेशी होमिओपॅथिक क्लिनीक**
एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, जीन मैदान शॉपींग सेंटर, करमाळा.

संपर्क : डॉ.बिपीन परदेशी (9922122989)/अभिषेक चुंबळकर (9763291193)


### संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखालील
## महायुती आदिनाथ बचाव पॅनलला विजयी करावे : महेश चिवटे

करमाळा(सं.प्र.) : माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी अडचणीतला आदिनाथ कारखाना पुन्हा जोमाने सुरू करण्याचा सभासदांना शब्द देऊन आदिनाथ कारखान्याचे शिवधनुष्य उचलले आहे. यामुळे तालुक्यातील सर्व सभासदांनी गट पक्ष सोडून राजकारण बाजूला ठेवून संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती आदिनाथ बचाव पॅनलला विजयी करावे; असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केले आहे.

महायुती आदिनाथ बचाव पॅनलचे अधिकृत उमेदवार जाहीर झाल्यानंतर श्री.चिवटे बोलत होते. पुढे बोलताना चिवटे म्हणाले, की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या मान्यतेनूसार महायुती आदिनाथ बचाव पॅनलची निर्मिती झाली आहे. आदिनाथ कारखाना सक्षमपणे चालवून ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, वाहतुकदार व आदिनाथवर अवलंबून असलेल्या सर्व घटकांना न्याय देण्यासाठी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी या निवडणुकीत शड्डू ठोकला आहे. आर्थिक अडचणीत असलेला आदिनाथ कारखाना राज्य सरकार व केंद्र सरकारच्या सहकार्याशिवाय ऊर्जेतावस्थेत येऊ शकत नाही. यामुळे महायुतीच्या माध्यमातून ही निवडणूक लढवली जात आहे. वेळप्रसंगी स्वत:च्या खिशातील पैसे टाकू मात्र आदिनाथ सक्षमपणे चालू करू; असा शब्द संजयमामा शिंदे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिला आहे. करमाळा तालुक्यातील ऊस उत्पादकाचे हित डोळ्यापुढे ठेवून संजयमामा शिंदे यांनी घेतलेला निर्णय अभिमानास्पद असून ते कारखान्याला निश्चितच गतवैभव प्राप्त करून देतील; असाही विश्वास चिवटे यांनी व्यक्त केला.

> आदिनाथ कारखाना करमाळा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मंदिर आहे. या माध्यमातून जवळपास २५ हजार कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. या तालुक्याने मला आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. त्याची उतराई म्हणून हा आदिनाथ कारखाना सक्षमपणे सुरू करून आदिनाथला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मी कटीबध्द आहे. वेळप्रसंगी पडेल ती किंमत मोजू, मात्र सभासदांनी टाकलेला विश्वास यशस्वी करून दाखवू.
>
> **...संजयमामा शिंदे**
> (माजी आमदार तथा पॅनल प्रमुख)


**श्रीकांत** इलेक्ट्रीकल्स & एसी सर्व्हीस
सावंतगल्ली, करमाळा.

**एसी सर्व्हीस व मेंटनन्सची सर्व कामे केली जातील.**

(प्रोप्रा : शिवाजी वीर) मो.9423333956, 7588482356, 7588392837



# कै.डॉ.प्रदीपकुमार (आबा)जाधव-पाटील यांच्या शुक्रवार दि.१८ एप्रिल २०२५ रोजी असणाऱ्या जयंती निमित्त

## आई कमला भवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, करमाळा.

## जाधव-पाटील हॉस्पिटल





करमाळा व महाराष्ट्रातील प्रसिध्द मुळव्याध तज्ञ

**डॉ.प्रदिप तुपेरे** एम.बी.बी.एस.,एम.एस.(जन.सर्जन)

यांच्या संयुक्त विद्यमाने

## सवलतीच्या दरात उपचार शिबीर

## मुळव्याध (पाईल्स)वर इंजेक्शन (स्क्लेरोथेरपी),लेझर ट्रिटमेंट

**रुग्णांना ही लक्षणे असल्यास शिबीराचा लाभ घ्यावा**

- शौचमार्गास दाह,जळजळ होणे
- शौचमार्गास खाज येणे
- गुदध्दाराभोवती आग होणे
- कोंब बाहेर येणे
- शौचातून रक्त येणे
- चिर पडणे

**इंजेक्शनचे विशेष गुणधर्म**

- मुळव्याधीच्या कोंबाना रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहीन्याभोवती विशिष्ट इंजेक्शन देवून रक्त पुरवठा गोठविण्यात येतो
- मुळव्याधीवर अत्याधुनिक उपचारत पध्दती, ऑपरेशनची गरज नाही
- ॲडमिट होण्याची गरज नाही
- मुळव्याधीच्या पहिल्या व दुसऱ्या अवस्थेतील रुग्णांकरिता अतिशय उपयुक्त उपचार पध्दती
- खाण्याचे विशेष पथ्य नाही

**मुळव्याध इंजेक्शन/लेझरसाठी पाळावयाच्या सुचना**

- इंजेक्शन घेण्यासाठी ५ तास उपाशी पोटी यावे.(सकाळी ६ नंतर खाऊ-पिऊ नये)
- डायबेटीस व ब्लडप्रेशर असल्यास सकाळचा डोस घ्यावा.
- इंजेक्शन मुळव्याधीच्या ठिकाणी दिले जाते
- हाताच्या शिरेतून भुलतज्ञांमार्फत भुल दिली जाते

सोबत टॉवेल किंवा लूंगी आठवणीणे घेवून येणे

**रविवार दि.२०/४/२०२५ सकाळी-८ ते ३ वा.**

**सकाळी ८ ते १० वेळेत हॉस्पिटलला हजर राहणे**

**शिबीराचे स्थळः-**

कै.डॉ.प्रदिपकुमार (आबा) जाधव-पाटील

"सहवास जरी सुटला तरी स्मृती कायम सुगंध देत राहील"

## जाधव-पाटील हॉस्पिटल

**डॉ.रोहन प्रदिप पाटील**
M.B.B.S. (M.D.Physician)
FCPS Medicine

**डॉ.सौ.शिवानी रोहन पाटील**
M.B.B.S.,M.D.Pathology

जाधव-पाटील हॉस्पिटल,अर्बन बँक शेजारी,मेन रोड,करमाळा,जि.सोलापूर.

(नाव नोंदणी आवश्यक) **शिबीरासाठी नाव नोंदणी संपर्क - Ph.(02182)299 611**

**Mo.7559214551 / 8329459591 / 7887578152 / 7507314133**


राज्यमंत्री म.राज्य
स्वीय सहाय्यक
जिल्हा कार्याध्यक्ष, भाजपा
गिरीश वसंतराव घुले
इंद्रजित पवार
डॉ.सोमनाथ साकोरे
ऊर्जा, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता,
महिला आणि बालविकास, सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम)
तथा पालकमंत्री परभणी
मा.नामदार
सौ.मेघनाताई साकोरे-बोर्डीकर
यांना दि.१० एप्रिल रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
जि.उपाध्यक्ष, भाजपा
शशिकांत पवार
सरपंच, देवळाली
धनंजय शिंदे
माजी सरपंच, पांगरे
संजय गुटाळ
माजी सभापती, पं.स.
शेखर गाडे
माजी सरपंच, साडे
दत्ता जाधव
उपसरपंच, चिखलठाण
योगेश दत्तात्रय सरडे
जि.कार्याध्यक्ष, केळी संघ
अविनाश सरडे
उद्योजक
दिनेश कानगुडे
माजी सरपंच, देवळाली
गहिणीनाथ गणेशकर
कन्सलटींग इंजिनिअर
समाधान गरड
शुभेच्छुक
भास्करराव भांगे
माजी सरपंच- कंदर
उपाध्यक्ष, अखिल भारतीय भाविक वारकरी संघटना
पश्चिम महाराष्ट्र
रविराज भास्कर भांगे
RB OVERSEAS EXPORT
Packing - supply - Export
कंदर (मो.८८८८७७४२१६)
PRAJOS ASSOCIATES
ER.SAMADHAN H. GARAD (M.E.Structure, F.I.V., AMIE)
Consuting Engineer / Structural Designer
Chartered Engineer / Govt. Regd. Valuer / License Engineer
Address : Near Nobel Hospital, Pune-Solapur Road, Hadapsar, Pune
Cell : + 91 9423373467, Office : 020 602200224